# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 08 June 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०८ जून २०२४ दुपारी १.०० वा.**

****

भाजपचे ज्येष्ठ नेते, नरेंद्र मोदी उद्या सलग तिसऱ्यांदा प्रंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नरेंद्र मोदी यांना आणि त्यांच्या नवीन मंत्रिमंडळाला शपथ देतील. दरम्यान, या शपथविधी समारंभाला भारताच्या शेजारी राष्ट्रांचे महत्वाचे नेते सहभागी होणार आहेत, अशी माहिती परराष्ट्रव्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी दिली. श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे, मालदीवचे राष्ट्रपती डॉक्टर मोहम्मद मुइज्जू, सेशेल्सचे उपराष्ट्रपती अहमद अफीफ, बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, नेपाळचे पंतप्रधान पुष्पकमल दहल, मॉरीशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जगनौथ आणि भूटानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे हे उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, या शपथविधी समारंभानंतर या नेत्यांची राष्ट्रपती भवनात बैठक होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळालेला जनतेचा कौल मान्य असल्याचं काँग्रेसचे अध्यक्ष मलिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे. दिल्ली इथं सुरु असलेल्या काँग्रेस पक्षाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. इंडिया आघाडी म्हणून आम्ही संसदेत आणि संसदेच्या बाहेरही कार्यरत राहू, असंही खर्गे म्हणाले. खर्गे यांच्यासह पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, खासदार राहूल गांधी आदी नेते या बैठकीला उपस्थित आहेत.

****

माध्यम जगतातील प्रख्यात व्यक्तिमत्व, पद्मविभूषण रामोजी राव यांचं तेलंगणातल्या हैद्राबाद इथं आज सकाळी निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. ईनाडू समूह आणि रामोजी चित्रपटसृष्टीचे ते संस्थापक होते. त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दुखः व्यक्त केलं आहे. देशानं माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील एक दिग्गज

व्यक्तिमत्व गमावलं असून पद्मविभूषण पुरस्कारप्राप्त राव यांची दृष्टी सामाजिक उत्थानासाठी रुजलेली होती, अशा शब्दात राष्ट्रपतींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. काळजीवाहू पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही रामोजी राव यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. रामोजी राव भारतीय माध्यमांमध्ये क्रांती घडवणारे द्रष्टे होते. त्यांच्या समृद्ध योगदानानं पत्रकारिता आणि चित्रपट जगतावर छाप सोडली. देशाच्या विकासाबद्दल त्यांना अत्यंत तळमळ होती, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. रामोजी राव यांच्या निधनानं लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचं अपरिमित नुकसान झाल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

****

मराठा आरक्षण आंदोनलकर्ते मनोज जरांगे यांच्या उपोषण आंदोलनाला अंतरवाली सराटीच्या ग्रामपंचायतीनं पाठिंबा दिला, अशी माहिती जरांगे यांनी दिली. अंतरवाली सराटी इथं उपोषण स्थळी ते आज माध्यमांशी बोलत होते. अंतरवाली सराटीत सर्व समाजातील गावकऱ्यांनी उपोषणाला पाठींब्याचं लेखी पत्र दिल्याचंही जरांगे यांनी म्हटलं आहे. दरम्यान, सकाळी दहा वाजेपासून जरांगे यांनी उपोषणाला सुरुवात केली. जरांगे हे आपल्या मागण्यांवर ठाम असून सरकारनं या मागण्या त्वरीत पूर्ण कराव्या, अन्यथा येत्या विधानसभा निवडणुकीत २८८ जागांवर उमेदवार उभे करण्याचा इशाराही त्यांनी राज्य सरकारला दिला.

****

यंदाच्या खरीप हंगामात बियाणं तसंच खतांच्या योग्य वितरणासाठी कृती दल निर्माण करण्याचे निर्देश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत. काल मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावर्षी खरिपाच्या क्षेत्रात एक लाख दहा हजार हेक्टरने वाढ झाली आहे. सध्याची एकूण बियाणे मागणी ही १८ लाख क्विंटल इतकी असून, त्यापैकी १३ लाख क्विंटल बियाणं वितरीत केलं आहे, आणखी सहा लाख क्विंटल बियाणं वितरणाची तयारी असल्याची माहिती, मुंडे यांनी दिली.

****

मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात आज जोरोचे वारे, मेघगर्जनेसह मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे तसंच पुढच्या पाच दिवसांत मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचीही शक्यता आहे. याच काळात तापमानातही दोन ते पाच अंशांनी घट होण्याचा अंदाज परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातल्या

हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, काल रात्री सांगली जिल्ह्यात सरी बरसल्या असून पालघर इथं आज पहाटे मेघगर्जनेसह पहिल्या पावसानं जोरदार हजेरी लावली.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज टेक्सास इथं झालेल्या सामन्यात बांग्लादेश संघानं श्रीलंकेचा दोन गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंका संघानं निर्धारित २० षटकात ७ बाद १२४ धावा केल्या. प्रत्त्युत्तरादाखल बांग्लादेश संघानं १९ षटकात आठ गडयांच्या मोबदल्यात विजय मिळवला.

अन्य एका सामन्यात अफगानिस्तान संघानं न्यझिलंड संघाचा ८४ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करत अफगानिस्तान संघानं २० षटकात ६ बाद १५९ धावा केल्या. मात्र, न्यझिलंड संघाचे ७५ धावांतच सर्व गडी बाद झाले.

****

दिल्लीतील नरेला औद्योगिक परिसरात एका कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत तिघांचा मृत्यू झाला असून सहाजण जखमी झाले आहेत. आज पहाटे साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली.

****